आर.ए.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

निनाईदेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री हिराई देशमुख नर्सिंग कॉलेज, कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१२/प्र.क्र.५६६/१२/शिक्षण-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः ११ ऑक्टोबर, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय क्र.एनयुआर-१३०३/सी.आर.१८७/२००३/शिक्षण-१, दि.२१.३.२००५

२) शासनाचे क्र.एनयुआर-२००८/सीआर-३०७/०८/शिक्षण-१, दि.३०.१.२००८ चे आवश्यकता प्रमाणपत्र.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.०२/ऑगष्ट/२००९, दि.१३.८.२००९

४) महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई यांचे पत्र क्र.मपप/जी/एएनएम-४४२/४७९९/२०१२, दि.३.९.२०१२

प्रस्तावना:

**निनाईदेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री हिराई देशमुख नर्सिंग कॉलेज, कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली** येथे २० (वीस) विद्यार्थी क्षमतेचा एएनएम नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्र. (२) अन्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुषंगाने सदर संस्थेस भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. (३) नुसार संस्थेस सन २०१२-१३ साठी २० (वीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह एएनएम अभ्यासक्रमास योग्यता/परवानगी दिले आहे. तसेच महाराष्ट्र परिचर्या परिषदेने संस्थेस अंतिम शासन मान्यता देण्याबाबत संदर्भ क्र. (४) अन्वये अभिप्राय सादर केले आहे. सदर परवानगी/अभिप्रायाच्या अनुषंगाने व संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपध्द्तीनुसार संस्थेस शासन निर्णयाद्वारे अंतिम मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

शासन निर्णय दि.२१.३.२००५ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्द्तीनुसार, भारतीय परिचर्या परिषदेने दिलेले योग्यता/परवानगी प्रमाणपत्र व महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे अभिप्राय या बाबी विचारात घेवून **निनाईदेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री हिराई देशमुख नर्सिंग कॉलेज, कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली** येथे सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी २० (वीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह एएनएम नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य शासन यांनी एएनएम नर्सिंग या अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) महाराष्ट्र इन्स्टिटयुट प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने कोटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.



Scanned by CamScanner

३) संस्थेने त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय/परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांस सेवानिवृत्ती अथवा स्वेच्छानिवृत्ती असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवरील नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

४) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषदेने एएनएम नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या मानकांची योग्यरित्या पूर्तता करुन संस्थेने दरवर्षी दोन्ही परिचर्या परिषदांची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

५) संस्थेस आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी शासनाकडे करता येणार नाही.

६) संस्थेने भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांची परवानगी मिळाल्यानंतर व महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुलुंड, मुंबई यांनी सलंग्नता दिल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशीत करण्यात यावेत.

७) उक्त परिषदांनी संस्थेस परवानगी नाकारल्यास प्रस्तुत शासन निर्णय आपोआप रद्द होईल.

८) सदर एएनएम नर्सिंग अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता २० (वीस) एवढी राहील. त्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या दर वर्षी महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुलुंड, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

१०) तसेच एएनएम नर्सिंग अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रे (पू) मुंबई करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.मा.आत्राम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली- ११०००२.
सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रे (पू) मुंबई-५१
प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, एल.बी.एस. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई
**अध्यक्ष/सचिव, निनाईदेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री हिराई देशमुख नर्सिंग कॉलेज, कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली**
मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-१)

suradkar/GR(ANM)-2012- 542

Scanned by CamScanner